# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र-१२** **दिनांक - ११/०१/२०२४**

## Credit Card वरुन झालेल्या Overseas Transaction फसवणूक रक्कम रुपये ५६४७२/- परत करण्यात सायबर पोलीस ठाणेस यश !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील काशिमिरा परिसरातील श्री. राहूल देतराज यांचे क्रेडीट कार्डवरुन ५६४७२/- रुपयाचे ०३ फसवणूक व्यवहार झाल्याचे लक्षात येताच तक्रारदार यांनी सायबर पोलीस ठाणे येथे तक्रार प्राप्त दिली.

**(सायबर पोलीस ठाणे आवक अर्ज क्रमांक – २७२१-बी/२०२३ दि.१३/११/२०२३)**

नमूद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली.
सदरचे क्रेडीट कार्डचे ०३ व्यवहार परदेशात झाल्याचे दिसून आले. तात्काळ तक्रारदार यांचे फसवणूक रक्कमेबाबत **Ratnakar Bank Limited (RBL Bank)** यांचेसोबत तात्काळ पत्रव्यवहार करून व दोन महिने कसोशीने सातत्यपुर्ण पाठपुरावा करुन नमूद फसवणूक रक्कम तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आली.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **Bank Debit Card Number,CVV, Pin, OTP etc.. संदर्भातील माहिती कोणाकडेही उघड करु नये**
- **आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती देवू नये.**
- **अनोळखी लिंक, ॲप्लीकेशन डाऊनलोड करु नये.**
- **क्रेडीट कार्ड, डेबिट कार्डद्वारे फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/ प्रसाद शेनोळकर, पोअं/१२०९२ प्रविण आव्हाड, मपोअं/ १६१०६ सुवर्णा माळी, मपोअं/ १३०८७ अमिना पठाण पोअं/२२००३ कुणाल सावळे, पोअं./२२०४० प्रशांत बोरकर यांनी पार पाडली आहे.

सायबर पोलीस ठाणे व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्रमांक :- ९०० ४८८ ०१३५

सायबर पोलीस ठाणे ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

oooooooo----------